# बीडच्या विद्यार्थ्याची पुण्यात आत्महत्या ;ॲकॅडमीच्या संस्थापकासह तिघांवर गुन्हा दाखल

बीड (सरकार) पुणे शहरातील हांडेवाडी परिसरात असलेल्या यशोतेज ॲकॅडमीच्या निवासी खोलीत मूळचा बीड येथील रहिवासी असलेला १६ वर्षीय विद्यार्थी अवधूत उल्हास बडे याने १० नोव्हेंबर २०२५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या प्रकरणी सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती, मात्र पोलीस तपासात ही आत्महत्या नैराश्यातून आणि संस्थेच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचे निष्पन्न झाले आहे. अखेर पाच महिन्यानंतर फुरसुंगी पोलिसांनी ॲकॅडमीचे संस्थापक, सीईओ आणि वॉर्डन यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

अवधूत बडे हा बीड शहरातील आनंद नगर येथील रहिवासी होता. त्याचे आई-वडील दोघेही शिक्षक असून त्याने एनडीए परीक्षेच्या तयारीसाठी यशोतेज ॲकॅडमीत प्रवेश घेतला होता. १० नोव्हेंबर रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास अवधूतने रूम नंबर ५१३ मध्ये छताच्या पंख्याला बेडशीटच्या साहाय्याने गळफास लावून आपले जीवन संपवले. या घटनेनंतर त्याचे वडील उल्हास म्हातारदेव बडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, अवधूतवर त्याच्या रूममेटचे तीन हजार रुपये चोरी केल्याचा आरोप करण्यात आला होता. यावरून वॉर्डन वसंत तुकाराम सरकटे यांनी अवधूतला ॲकॅडमीतून काढून टाकण्याची (रस्टीकेट) धमकी दिली होती. या मानसिक दबावामुळे आणि भीतीपोटी अवधूत नैराश्यात गेला होता. महत्त्वाचे म्हणजे, अवधूत अल्पवयीन असतानाही अशा परिस्थितीत त्याचे योग्य समुपदेशन करण्यात आले नाही. तसेच, घडलेल्या प्रकाराची माहिती त्याच्या पालकांनाही वेळेत देण्यात आली नाही असा ठपका फिर्यादीत ठेवण्यात आला आहे.

या प्रकरणी ॲकॅडमीचे संस्थापक व संचालक तेजस पद्माकर पाटील, सीईओ विकास सुरेश पाटील आणि वॉर्डन वसंत तुकाराम सरकटे यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १०६ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्यात हलगर्जीपणा केल्यामुळे एका निष्पाप विद्यार्थ्याला जीव गमवावा लागल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शंभुराज जाधव या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.


# बीडसरकार

beedsarkar

संपादक-आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १३ वे ■ अंक १५० ■ सोमवार २० एप्रिल २०२६ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल दि.२१ एप्रिल २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 13 ■ Issu 150 ■ Monday 20 April 2026 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# अजित पवार गटाच्या नेत्यावर परळीत ६ जणांचा मध्यरात्री जीवघेणा हल्ला



बीड (सरकार) बीड जिल्ह्याच्या परळी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती संजय जाधव यांच्यावर काल १९ एप्रिल रोजी रात्री उशिरा ५ ते ६ अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला. त्यांच्यावर कोयत्याने सपासप वार करून जीवघेणा प्रकार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या भीषण हल्ल्यात संजय जाधव हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकरणी मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, काल रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास संजय जाधव हे गोवर्धन हिवरा ते सिरसाळा रोडवर असलेल्या आपल्या शेताकडून घराकडे नेहमीप्रमाणे जात होते. ते गोवर्धन शिवारात आले असता, दबा धरून बसलेल्या ५ ते ६ अज्ञात इसमांनी त्यांना अचानक अडवून त्यांच्यावर हल्ला चढवला. हल्लेखोरांनी कोयत्यासारख्या धारदार शस्त्राने जाधव यांच्यावर सपासप वार करत त्यांना गंभीर जखमी केले या हल्ल्यात संजय जाधव हे रक्ताच्या थारोळ्यात जागेवरच कोसळले.

परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी जाधव यांना तत्काळ उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले आल्याचे सांगण्यात आले आहे. बाजार समितीच्या माजी पदाधिकाऱ्यावर असा हल्ला झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे पहावयास मिळत आहे.

नेमका हल्ला कोणी आणि का केला असावा या हल्ल्यामागे नेमके कारण काय असावे, याबाबत परिसरातील नागरिकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे. तर काही दिवसांपूर्वीच संजय जाधव यांनी गावातील एका तरुणाला मारहाण केल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. या पार्श्वभूमीवर, हा हल्ला त्याच वादातून झाला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. तो व्हायरल व्हिडिओ आणि आता झालेला हा प्राणघातक हल्ला या दोन्ही गोष्टींमध्ये तर्क वितर्क लावला जात असून सध्या जिल्ह्यात या अनुषंगाने मोठी चर्चा सुरू असल्याचेही बोलले जात आहे. मात्र नेमके कारण काय अद्याप समोर आले नाही.

# गर्भपातानंतर रुग्णालयात धाव,डॉक्टरांच्या तत्परतेमुळे बालविवाहाचे क्रूर सत्य समोर

## 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा

केज (सरकार): पोटात दुखू लागल्याने आणि अतिरक्तस्राव होत असल्याने सोलापूर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केलेल्या एका अल्पवयीन विवाहितेच्या उपचारादरम्यान बालविवाहाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रुग्णालयात कागदपत्रे तपासली असता पीडितेचे वय उघड झाले आणि तेथूनच कायद्याचा बडगा उगारला गेला. या प्रकरणी पतीसह दोन्ही कुटुंबांतील पाच जणांविरुद्ध बालविवाह प्रतिबंधक कायदा व 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा नोंदवून तो केज पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पीडित मुलगी १० वीत शिकत असतानाच, दोन वर्षांपूर्वी तिचा विवाह केज तालुक्यातील एका गावात लावून देण्यात आला होता.ती अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही दोन्ही कुटुंबांनी हा विवाह लावून दिला होता.काही दिवसांपूर्वी पीडितेच्या पोटात दुखू लागल्याने तिला सुरुवातीला स्थानिक ग्रामीण रुग्णालय आणि त्यानंतर धाराशिव येथील रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, प्रकृती अधिक बिघडल्याने तिला सोलापूरच्या जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे उपचारादरम्यान तिचा ६ महिन्यांचा गर्भपात झाला. रुग्णालयाने वयाशी संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली असता, ती अल्पवयीन असल्याचे समोर आले. सोलापूर पोलिसांनी तत्काळ पीडितेचा जबाब नोंदवून 'झीरो'ने गुन्हा दाखल केला आणि तो पुढील कारवाईसाठी केज पोलिसांकडे वर्ग केला.अल्पवयीन असतानाही विवाह करणे आणि पीडितेशी शारीरिक संबंध ठेवल्याबद्दल पतीविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत कठोर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या विवाहासाठी जबाबदार असलेले आई-वडील, सासू-सासरे आणि इतर नातेवाइकांवरही बालविवाहास प्रोत्साहन दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे, अशी माहिती पोलिस प्रशासनाकडून देण्यात आली.

# नवगण राजुरीत गुटख्याच्या साठ्यावर कारवाई

## २,१९,२७० चा मुद्देमाल जप्त

बीड (सरकार)तालुक्यातील नवगण राजुरी येथील तांबोळी गल्लीत विविध कंपनीचा गुटखा साठून ठेवल्याची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना मिळताच शनिवार (दि.१८) रोजी कारवाई करत २,१९,२७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एकाला आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.



बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलींग करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि नवगण राजुरी येथील तांबोळी गल्लीत रज्ञाक गनीभाई तांबोळी याने विविध कंपनीचा गुटखा विक्री करण्यासाठी साठून ठेवल्याची माहिती मिळाली सदरील ठिकाणी शनिवार (दि.१८) रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास कारवाई केली असता तंबाखू,पानमसाला,विमल,हिरा असा विविध कंपनीचा गुटखा चोरटी विक्री करण्यासाठी साठवून ठेवल्याचे निदर्शनात आले असून २,१९,२७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत सदरील आरोपीला ताब्यात घेत त्याच्याविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.अधिक तपास पोलीस करत आहेत. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि.सोमनाथ जाधव,सपोनि.बाळराजे दराडे,पोउपनि संजय कुकलारे,पोह मनोज जोगदंड,फिरोज पठाण,सोमनाथ जायभाये,सचिन कापसे यांनी केली

# लग्नाचे आमिष दाखवून चौदा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर सात महिन्या पासून अत्याचार

केज (सरकार): केज तालुक्यात विदर्भातील चौदा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर लग्नाचे आमिष दाखवून सतत सात महिन्या पासून एकाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे.

विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील एक कुटुंब हे मोल मजुरीसाठी केज तालुक्यातील एका गावात राहत आहे. त्याच गावातील



एका तरुणाने त्या कुटुंबातील एका चौदा वर्षाच्या अल्पवयीन मुलीला तिच्याशी लग्न करण्याचे अमिष दाखवू त्याच्यावर १ सप्टेंबर २०२५ ते १४ एप्रिल २०२६ पर्यंत शेतात तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केला. तसेच कुणाला सांगितल्यास तिच्या वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या तक्रारी वरून त्या नराधम तरुणाच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. २०९/२०२६ भा. न्या. सं. ६५(१), ३५२ यासह पोक्सोचे कलम ४ व ६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या :- पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके आणि पोलिस कॉन्स्टेबल भागवत निरडे यांनी रात्री नराधम आरोपीला त्याच्या घरातून रात्री ताब्यात घेतले. आज त्याची चौकशी झाल्या नंतर त्याला न्यायालया समोर हजर करण्यात येण्याची शक्यता आहे.

# राज्यातून १ कोटी सह्या घेणार,काँग्रेसचा महिला विरोधी चेहरा उघड करू: सीएम फडणवीस

मुंबई (सरकार): उद्धवसेना, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि काँग्रेसचा महिला विरोधी चेहरा आम्ही उघड करू. आम्ही महिलांचे एकत्रीकरण करणार आहोत. लोकशाहीत जनमताचा रेटा यांच्या लक्षात येईल, तेव्हा हे महिला आरक्षणाला पाठिंबा देतील. महिलांना संघटित करण्याचे काम करण्यासह राज्यातून १ कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार आहोत, जनजागृती करणार आहोत. आम्ही मेळावा बोलावला आहे. तिथे आमच्या मित्र पक्षांना निमंत्रित करू. महिलांना आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री फडणवीस पत्रकार परिषदेत बोलत होते.



महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक संसदेत नामंजूर झाल्याच्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन सविस्तर भूमिका मांडली. गृहमंत्र्यांनी सांगितले आम्ही बदल करतो, तुम्ही पाठिंबा द्यावा. विरोधकांची बोलती बंद झाली. भाजपावर आरोप केले. राजस्थान, गुजरात, दिल्ली अशा ठिकाणी भाजपाने महिला मुख्यमंत्री दिले . या लोकांनी कधीही याठिकाणी महिलांना मुख्यमंत्री बनू दिले नाहीत. माझ्या स्तरावरील कोणत्याही नेत्याने माझ्याशी खुली चर्चा करावी. माझे आव्हान आहे. मात्र, ते करणार नाहीत. ते पळून जातात, असा टोला मुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला.

# माकेगावात जमिनीच्या वादातून शेतकऱ्यावर जीवघेणा हल्ला

**दगडाने डोके फोडले, तिघांवर गुन्हा दाखल**

अंबाजोगाई (सरकार): शेतजमिनीच्या बांधावरून असलेल्या जुन्या वादातून एका शेतकऱ्यावर दगडाने जीवघेणा हल्ला केल्याची घटना अंबाजोगाई तालुक्यातील माकेगाव येथे घडली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या शेतकऱ्यावर लातूर येथील रुग्णालयात मेंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. याप्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

माकेगाव येथील संजय उद्धवराव देशमुख (वय ४६, व्यवसाय शेती) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. संजय देशमुख आणि त्यांचे चुलते कल्याण जीवनराव देशमुख यांचे त्यांच्याच नात्यातील नारायण बाबूराव देशमुख यांच्याशी गेल्या दोन वर्षांपासून शेतीच्या बांधावरून घरगुती वाद सुरू आहेत. १६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास संजय आणि कल्याण देशमुख हे गावातील रोडवर नवनाथ टेलरच्या दुकानाजवळ जळालेल्या मोटरच्या दुरुस्तीबाबत बोलत थांबले होते.यावेळी नारायण बाबूराव देशमुख, अमर नारायण देशमुख आणि अयोध्या नारायण देशमुख हे तिघे आपसात संगनमत करून त्या ठिकाणी आले. 'तुला लय माजलास, तुला आता खतमच करून टाकतो' असे म्हणत नारायण देशमुख यांनी कल्याण यांना पकडले, तर अमर देशमुख याने हातातील दगडाने त्यांच्या डोक्यात जोरात मारहाण केली. नारायण यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तर अयोध्या देशमुख यांनी शिवीगाळ केली. या हल्ल्यात कल्याण देशमुख बेशुद्ध पडल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

जखमी कल्याण यांना तातडीने अंबाजोगाईतील सरकारी रुग्णालयात आणि त्यानंतर अधिक उपचारासाठी लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. त्यांच्या मेंदूला गंभीर दुखापत झाल्याने शस्त्रक्रिया करण्यात आली असून ते सध्या आयसीयूमध्ये उपचार घेत आहेत. अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९,११५(२), ३५२, ३५१(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक रंगनाथ मुरलीधर जगताप या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# डेंग्यूवर पहिली भारतीय लस तयार

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) भारतात दरवर्षी पावसाळ्यात डेंग्यूचे संकट अक्राळविक्राळ रूप धारण करते. डेंग्यूचा वाढता धोका लक्षात घेता आरोग्य क्षेत्रातून एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारताने डेंग्यूवरील पहिल्या लसीला म्हणजेच ढअघ-००३ अर्थात टवशपसर (क्युडेन्गा) ला अधिकृत मंजुरी दिली आहे. औषध महानियंत्रकांच्या तज्ज्ञ समितीने ४ ते ६० वयोगटातील लोकांसाठी ही लस सुरक्षित असल्याचे मानले आहे. जपानच्या टाकेडा फार्मास्युटिकल्स कंपनीने विकसित केलेली ही लस अत्यंत प्रभावी मानली जात आहे. या लसीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, एखाद्या व्यक्तीला पूर्वी डेंग्यू होऊन गेला आहे किंवा नाही, याची कोणतीही तपासणी न करता ही लस देता येते. डेंग्यूच्या चारही प्रकारच्य विषाणूंपासून संरक्षण देण्याची क्षमता क्युडेन्गा लसीमध्ये आहे. क्लिनिकल ट्रायल्समध्ये असे दिसून आले आहे की, ही लस चार वर्षांहून अधिक काळ संरक्षण देऊ शकते.

# केजमध्ये लग्न करण्यास नकार दिल्याने आई, मुलीचा विनयभंग

केज (सरकार): महिला अल्पवयीन मुलगी घरी असताना एका तरुणाने मागील बाजूने घरात प्रवेश करून विवाहिता व तिच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. दरम्यान महिलेच्या पतीवर विळ्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे.

केज तालुक्यातील एका गावात दि.१८ एप्रिल रोजी सायंकाळी ६:०० वा. च्या सुमारास एक तरुण दारु पिऊन घराचे पाठीमागे लावलेले पत्र्याचे शेडवरुन उडी मारुन आत आला. त्याने विवाहित महिलेच्या अंगाशी झोंबाझोंबी केली. त्याचा जाब विचारताच त्याने त्या विवाहितेला शिवीगाळ केली आणि म्हणाला की, ''तुझ्या मुलीला माझ्या सोबत लग्न करण्यास सांग.'' असे म्हणुन मुलीच्या अंगाला वाईट उद्देशाने स्पर्श केला. तसेच म्हणाला की, मुलीचे लग्न जर त्याच्या सोबत केले नाही, तर लैंगिक अत्याचार करण्याची धमकी दिली.

त्यानंतर ती महिला व तिच्या पतीने याचा त्याला जाब विचारला असता त्याने पुन्हा त्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून धारदार विळ्याने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. महिलेच्या तक्रारी वरून आशीष अशोक धिवार याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. २१९/२०२६ भा. न्या. सं. ७४, ३५१, ३५१(२), ३५२, ३२९ आणि पोक्सोचे कलम ८,१२,१८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे हे तपास करीत आहेत.

# पोलीस निरीक्षकाने चक्क आपल्याच ट्रॅफिक हवालदाराला दंड ठोठावला

केज (सरकार):दुचाकीवर प्रवास करताना स्वतःच्या सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे अत्यंत गरजेचे आहे. अनेक शासकीय व निमशासकीय कर्मचारी सुद्धा हेल्मेट वापर करीत नसल्याने केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक उनवणे यांनी वाहतूक शाखेचे पोलिस हवालदार यांना एक हजाराचा दंड ठोठावला.

रस्ते अपघातात दुचाकी स्वारांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असल्याने दुचाकी स्वार आणि पाठीमागे बसलेला या दोघानीही हेल्मेट घालणें अनिवार्य आहे. त्या संदर्भात त्याची अंमलबजावणी सुरू आहे. सोमवारी (दि. २०) सकाळी ११



वाजण्याच्या सुमारास केज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे हे पोलिस ठाण्याच्या आवारात असताना त्याच वेळी वाहतूक शाखेचे हवालदार हे विना हेल्मेटचे मोटार सायकलवर येत असल्याचे दिसताच स्वामील उणवणे यांनी त्यांना एक हजारा चा ऑनलाईन दंड देऊन त्याचे ई चालान फाडले. भारतात रस्ते अपघातांचे प्रमाण अत्यंत चिंताजनक असून, हेल्मेट न वापरणे हे दुचाकीस्वारांच्या मृत्यूचे प्रमुख कारण बनले आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या आकडेवारी नुसार, दरवर्षी ५०,००० हून अधिक दुचाकीस्वारांचा जीव जातो, ज्यामध्ये बहुतेकजण हेल्मेट वापरत नाहीत.

## संपादकीय

# मुलांचे करिअर आणि पालकांची परीक्षा

दहावी आणि बारावीच्या परीक्षा संपल्यानंतरचा काळ हा मुलांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात अनेकदा पालक मुलांवर पुढील शिक्षण किंवा करिअर निवडीबाबत दबाव टाकतात. मात्र, कितीही झाले तरी मुलांवर सक्ती करू नये. प्रत्येक मुलाची आवड, क्षमता आणि स्वप्ने वेगळी असतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. परीक्षा संपल्यानंतर काही काळ मुलांना मोकळा श्वास घेऊ द्यावा. मुलांना आपले करिअर निवडताना पालकांनी एक मार्गदर्शक म्हणून काम करायला हवे.

मुलांच्या जीवनात दहावी आणि बारावीच्या परीक्षा अतिशय महत्त्वाच्या असतात. याच परीक्षा मुलांना त्यांच्या पुढील शिक्षणाच्या दिशा ठरवून देतात. त्यासाठी आता मुलांच्या परीक्षा संपल्या असल्या तरी पालकांच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत असे म्हणता येईल. मुलांचे करिअर घडविताना मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहीत असतात. त्यामुळे आपल्या मुलांच्या करिअरची दिशा ठरवू शकतात. याचा परिणाम मुलांचा व पालकांचा वेळ, पैसा व श्रम वाचण्याला मदत होते. तो वेळ, पैसा व श्रम यांचा इतर ठिकाणी वापर करू शकतात. महत्त्वाची बाब म्हणजे, मुलांचे करिअर निवडताना पालकांना योग्य नियोजन करावे लागते. त्यासाठी दहावी आणि बारावीच्या परीक्षा मुलांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असतात. तेव्हा मुलांचे करिअर निवडताना पालकांनी मुलांवर सक्ती करू नये. त्यांच्या सुद्धा आवडीनिवडीचा विचार करावा. तेव्हा पालकांनी मुलांना दिलेल्या अधिकाराचा गैरवापर मुलांनी सुद्धा करू नये. त्याचबरोबर मुलांनी आपला शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी पालक अथक प्रयत्न करीत असतात, हे विसरून चालणार नाही. त्यासाठी मुले आणि पालक यांच्यात वेळच्यावेळी अभ्यासाच्या संदर्भात चर्चा होणे गरजेची आहे. डॉक्टरला वाटते माझी मुले डॉक्टर व्हावीत, वकिलाला वाटते माझी मुले वकील व्हावीत, शिक्षकाला वाटते माझी मुले शिक्षक व्हावीत, मात्र माझे असे मत आहे, ज्या क्षेत्राची आवड मुलांना असेल त्या क्षेत्रात त्यांनी करिअर करावे. तशा रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. म्हणजे मुले आणि पालक यांच्यामध्ये विचारविनिमय होणे गरजेचे आहे. शक्यतो भविष्याच्या दृष्टीने एक वाक्यता हवी. बरीच मुले नंतर पालकांना दोष देतात. काही मुले पालकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना मदत करत अभ्यास करतात आणि आपल्या स्वत:च्या पायावर उभे राहून आपल्या आवडीनिवडी पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. यात अनेक मुलांना यश आले आहे.

पालकांनी आपल्या मुलांच्या करिअरचा विचार करत असताना एक मित्र आणि मार्गदर्शक म्हणून आपली भूमिका मुलांसमोर मांडावी. तेव्हाच मुलांच्या खऱ्या अर्थाने जीवनाला सुरुवात होत असते. यातच पालकांची खरी परीक्षा असते. काही पालक करिअर मार्गदर्शक केंद्रावर आपल्या मुलांना घेऊन जातात. यामुळे कोणकोणत्या नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत किंवा कोणत्या शाखेची निवड केल्यावर आपल्याला कोणत्या क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात याची पूर्वकल्पना मुलांना येते. त्यामुळे अभ्यासक्रम निवडणे सोपे जाते.


आता खऱ्या अर्थाने पालकांची परीक्षा सुरु झाल्याने आपल्या मुलांची आवडनिवड लक्षात घेऊन मुलांना त्यांचे करिअर निवडण्यासाठी मार्गदर्शन करावे. मात्र सक्ती करू नये. एखादा मार्ग कठीण वाटत असेल तर सोप्या भाषेत समजवून सांगा म्हणजे त्या क्षेत्रातील आवड निर्माण होऊन आपले करिअर करू शकतो. त्यासाठी योग्यवेळी करिअर मार्गदर्शनाची गरज असते. काही मुले आपल्या मित्राने जी शाखा निवडली त्यामुळे तो त्या शाखेकडे जातो, असे बऱ्याच मुलांचे चित्र आपल्याला पाहायला मिळते. करिअरच्या दृष्टीने मुलांना शाखा निवडणे, त्याविषयी मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे. त्यामुळे मुलांच्या जीवनात हा महत्त्वपूर्ण निर्णय असतो. त्यासाठी सेवक तत्त्वावर होणारी भरती रद्द करून सरळ सेवा भरती करणे जास्त हिताचे ठरणार आहे. आज अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांची परिस्थिती गृहीत धरल्यास घरात एक व्यक्ती कमावणारी असते आणि चार लोक खाणारे असतात. त्यात अधूनमधून नातेवाइकांचा सुद्धा समावेश असतो. वाढत्या महागाईचा विचार केल्यास कंत्राटी पद्धतीमुळे त्यांचा जीव टांगणीला आलेला असतो. त्यामुळे आताच्या मुलांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. शासन स्तरावर देखील रोजगाराच्या वेगवेगळ्या नवीन संधी निर्माण करता आल्या पाहिजेत. असे असले तरी उन्हाळी सुट्टीत मजा करत असताना आतापासून आपली आवड लक्षात घेऊन करिअरचे नियोजन केले पाहिजे. जेणेकरून भविष्यात रोजगाराच्या संधी निर्माण होतील अशा क्षेत्राकडे वळावे. त्यासाठी विविध क्षेत्रांचा अभ्यास करावा लागेल. तसेच इयत्ता सातवी आणि आठवीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी करिअरच्या दृष्टीने विचारविनिमय करावा. म्हणजे दहावी आणि बारावीनंतर पुढे काय करता येईल याचे उत्तर अधिक सुलभरीत्या त्यांना मिळू शकते. आपण पाहिले तर बऱ्याच वेळा मुले परीक्षेच्या काळात तणावग्रस्त असलेले दिसतात. अभ्यास नीट न झाल्याने पास होऊ की नापास याची मुलांना अधिकच भीती असते. तसेच या तणावाखाली येऊन अनेक मुले आत्महत्या करण्याचा पर्याय निवडतात, आपल्याला परीक्षेत कमी गुण मिळाले तर पुढे काय करायचे? असे अनेक प्रश्न मुलांना सतावत असतात. त्यामुळे मुलांना तणाव निर्माण होतो. अशावेळी पालकांनी मुलांना धीर दिला पाहिजे. परीक्षा काळात मुलांच्या अभ्यासासाठी घरात शांतता हवी. तसेच त्याने एकाग्रतेने अभ्यास करायला हवा असे वातावरण निर्माण केले गेले पाहिजे. मुलांच्या आहाराकडे आणि त्यांच्या विश्रांतीकडे लक्ष द्यावे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा संपल्यानंतरचा काळ हा मुलांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात अनेकदा पालक मुलांवर पुढील शिक्षण किंवा करिअर निवडीबाबत दबाव टाकतात. मात्र, कितीही झाले तरी मुलांवर सक्ती करू नये. प्रत्येक मुलाची आवड, क्षमता आणि स्वप्ने वेगळी असतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. परीक्षा संपल्यानंतर काही काळ मुलांना मोकळा श्वास घेऊ द्यावा. त्यानंतर शांतपणे आणि खुलेपणाने पालक व मुलांनी एकत्र बसून पुढील वाटचालीबाबत चर्चा करावी. मुलांची एकमेकांशी वारंवार तुलना करणे टाळावे. मुलांना काय आवडते, त्यांची ताकद काय आहे, त्यांना कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. पालकांची भूमिका केवळ निर्णय लादण्याची नसून योग्य मार्गदर्शन करण्याची असते. मुलांना आपले करिअर निवडताना पालकांनी एक मार्गदर्शक म्हणून काम करावे. मुलांना विविध पर्यायांची माहिती देणे, त्यांचे फायदे-तोटे समजावून सांगणे आणि त्यांच्या निर्णयाला पाठिंबा देणे हे अधिक गरजेचे आहे. मुलांचे करिअर हा त्यांच्या आयुष्याचा दीर्घ प्रवास आहे. त्या प्रवासात योग्य दिशा दाखवणे, त्यांना आत्मविश्वास देणे आणि त्यांच्या निवडीचा आदर करणे हीच पालकांची खरी परीक्षा आहे.

# संस्काराची शिदोरी



'संस्कार' म्हणजे गुणांचा गुणाकार आणि दोषांचा भागाकार, अशी कुठेतरी व्याख्या वाचली आणि मला या विषयावर लिहावेसे वाटले.

शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, सामाजिक आणि आध्यात्मिक विकासासाठी संस्कार गरजेचे आहेत. निरोगी समाजमन निर्माण करण्यासाठी संस्काराची आवश्यकता आहे. हिंदू धर्मात मुख्य सोळा संस्कार आहेत. गर्भधारणेपासून मृत्यूपर्यंतचे काही धार्मिक विधींचे त्यात वर्णन केलेले आहे. महत्त्व विशद केलेले आहे. आपण या विषयात खोलात न जाता 'संस्कार' शब्द उच्चारल्यावर आपल्याला काय आठवते ते पाहूया. स्वच्छता पाळणे, कोणत्याही छोट्या-मोठ्या कामासाठी शिस्त अंगी बाळगणे, चांगले ऐकणे तसेच चांगले बोलणे इ. म्हणजे आपला जन्म झाल्यापासून आपले आजी-आजोबा शेजारीपाजारी, नातेवाईक, आईवडील सगळेच आपल्याला संस्कारित करण्याचा प्रयत्न करतात आणि शाळेत गेल्यावर गृहपाठ इत्यादी नियमित करून आणण्याचे काही संस्कार आपल्यावर आपोआप घडत जातात.




इथे मला माझ्या लहानपणी आमच्या प्रायमरी शाळेचे प्राचार्य पाटील सर सांगायचे ती गोष्ट आठवली. ते आम्हा सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या मैदानात बसवून गोष्टी सांगायचे. एकदा त्यांनी आम्हाला चोरी करणे वाईट असते याशिवाय आईचे संस्कार कसे चुकीचे होते, अशी तात्पर्य देणारी कथा ऐकवली, ती मला अजूनही जशीच्या तशी आठवत आहे. एक मुलगा शाळेतून दुसऱ्या मुलाची पेन्सिल घेऊन घरी आला. त्याच्या आईने ते पाहिले पण त्याला काहीच बोलली नाही. मग एक दिवशी तो दुसऱ्या एका मुलाचा पूर्ण कंपास बॉक्स घेऊन घरी आला तेव्हाही आई काहीच बोलली नाही. असे करत करत तो मुलगा मोठमोठ्या चोऱ्या करू लागला. लुटमार करू लागला. एकदा लुटमार करत असताना त्याला ज्या व्यक्तीने अडवले त्याचा याने खून केला. हे कृत्य केल्यावर तो घरी आला आणि घरात लपला तेव्हा आईने पोलिसांना तो घरात नसल्याचे सांगितले; परंतु पोलिसांनी त्याला त्यांच्या घरातून शोधून काढले आणि त्याने खून केला असल्याचे आईला सांगितले. तेव्हा मात्र आई हादरली आणि ती स्वतःच म्हणाली, घेऊन जा याला माझ्या डोळ्यांसमोरून!

आईने त्याला पोलिसांच्या हाती सुपूर्द केले; परंतु आई रडता रडता म्हणाली, की मी माझ्या मुलावर चांगले संस्कार केले असते तर ही वेळ आली नसती. त्याने जेव्हा पहिली चोरी केली तेव्हाच चोरी करणे कसे वाईट आहे, हे मी त्याला सांगायला हवे होते!

या गोष्टीतून छोट्यातली छोटी चोरी करणे वाईट असते त्यामुळे आपण मोठा चोर होतो, खुनी होतो ही गोष्ट मनावर बिंबवली गेली. इतकेच नव्हे तर पूर्वी काहीही ऐकले की ते आई-वडिलांना सांगायची सवय होती, भावंडांना सांगायची सवय होती, मित्र-मैत्रिणींना सांगायची सवय होती. त्यामुळे चांगल्या गोष्टी, चांगले संस्कार अशा तऱ्हेने सर्व दूर पोहोचत होते. अशा संस्कार देणाऱ्या कथा ज्या लहानपणी ऐकल्या आहेत त्या एखाद्या शाळेच्या कार्यक्रमात किंवा घरी आलेल्या लहान मुलांना आपोआपच सांगितल्या जातात.

मला असे वाटते, की 'संस्कार' ही अशी गोष्ट आहे की ती प्रत्यक्ष न शिकवता अप्रत्यक्षपणे मुलांच्या किंवा कोणाच्याही मनावर बिंबवली जाऊ शकते. याचे अत्यंत साधे उदाहरण म्हणजे आई-वडील जर ताटात अन्न उष्ट टाकत नसतील तर तीच चांगली सवय मुले उचलतात. हे एक चांगल्या संस्काराचे उदाहरण आहे त्याचप्रमाणे आई-वडील सातत्याने एकमेकांशी भांडत असतील किंवा भांडताना अपशब्द वापरत असतील, तर त्या घरातली मुले आपोआपच भांडताना तेच अपशब्द वापरतात. याउलट मुले जेव्हा घरी येऊन सहज बोलता बोलता एखादा अपशब्द वापरतात तेव्हा तो कसा चुकीचा आहे आणि आम्ही कधी वापरताना तू ऐकला आहेस का?, असे जेव्हा मुलांना सांगितले जाते तेव्हा ते त्याचा पुनरुच्चार करत नाहीत, हे स्वाभाविकच आहे.

कसे बोलावे हे जाणून घेणे आणि त्याप्रमाणे वागणे ही कला आहे. परंतु कसे बोलू नये आणि आपल्या शब्दांनीही कोणाला दुखावू नये, हा संस्कार आहे!

त्यामुळे आपल्याकडे चांगले बोलण्यासारखे काही नसेल आणि आपल्या बोलण्यामुळे कोणी दुखावले जात असेल, तर ते बोलणे टाळूया कारण शरीरावरच्या जखमा भरून येतात पण मनावरच्या जखमा कधीच भरून येत नाहीत!

# मुलांची स्मरणशक्ती वाढवण्यासाठी

मुलांच्या वाढत्या वयात त्यांच्या शारीरिक विकासासोबतच मेंदूचा विकास होणे अत्यंत महत्त्वाचे असते. योग्य आहारामुळे मुलांची एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढण्यास मोठी मदत होते.

मुलांच्या आहारात खालील ७ सुपरफूड्सचा समावेश केल्यास त्यांची बुद्धिमत्ता तल्लख होण्यास नक्कीच मदत होईल:

**१) अक्रोड आणि बदाम :** हे मेंदूसाठी सर्वात उत्तम मानले जातात. का? यामध्ये 'ओमेगा-३ फॅटी सिड्स' (जाशसर-३) भरपूर प्रमाणात असतात, जे मेंदूच्या नसा मजबूत करतात.

कसे द्यावे? रोज सकाळी भिजवलेले ५ बदाम आणि २ अक्रोड मुलांना खायला द्यावे. अक्रोडचा आकारही मेंदूसारखाच असतो, जो मेंदूच्या आरोग्यासाठी उत्तम असतो.



**२. हिरव्या पालेभाज्या :** पालक, मेथी, ब्रोकली यांसारख्या भाज्यांचा समावेश करा. का? यात व्हिटॅमिन घ, फोलेट आणि बीटा-कॅरोटीन असते, जे मेंदूला थकवा येऊ देत नाही आणि स्मरणशक्ती तीक्ष्ण ठेवते. कसे द्यावे? भाजी आवडत नसेल तर पराठे, सूप किंवा कटलेटमध्ये मिसळून द्या.

**३. अंडी :** जर तुम्ही मांसाहारी असाल, तर अंडी हा सर्वोत्तम पर्याय आहे. का? अंड्यातील पिवळ्या बलकात 'कोलीन' नावाचे पोषक तत्व असते, जे स्मरणशक्ती वाढवण्यासाठी अत्यंत आवश्यक असते.कसे द्यावे? उकडलेले अंडे किंवा ऑम्लेट नाश्त्याला देणे फायदेशीर ठरते.

**४. दूध आणि दही :** भारतीय आहारात दुधाला पूर्णान्न मानले जाते. का? यात प्रथिने आणि बी-व्हिटॅमिन्स असतात, जे मेंदूच्या पेशींच्या विकासासाठी मदत करतात. कसे द्यावे? रोज एक ग्लास दूध (शक्य असल्यास हळद टाकून) आणि दुपारच्या जेवणात वाटीभर ताजे दही द्यावे.

**५) स्ट्रॉबेरी, जांभूळ, संत्री आणि सफरचंद.:** का? या फळांमध्ये 'अँटीऑक्सिडंट्स' भरपूर असतात, जे मेंदूवरील ताण कमी करतात आणि शिकण्याची क्षमता वाढवतात. कसे द्यावे? मुलांना मधल्या वेळेत स्नॅक्स म्हणून फळे कापून द्या.

६. तूप : आयुर्वेदानुसार गाईचे तूप बुद्धीवर्धक मानले जाते. का? तुपातील चांगले फॅट्स मेंदूला पोषण देतात. कसे द्यावे? वरण-भातावर किंवा पोळीला लावून गाईचे साजूक तूप द्यावे.

**७. ओट्स आणि कडधान्ये :** का? मेंदूला काम करण्यासाठी सतत ऊर्जेची गरज असते. ओट्स आणि कडधान्यांमधून मिळणारे फायबर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवून मेंदूला सतत ऊर्जा पुरवतात.

*************

# भावसार समाजातील तरुणांनी उद्योग, व्यवसायात पुढे यावे - कानगावकर

## अंबाजोगाई येथे सार्थक मेन्स वेअरचे अक्षय त्रतीयाच्या मुहूर्तावर उद्‌घटन संपन्न

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- भावसार समाजातील तरुणांनी उद्योग आणि व्यवसायात आघाडी घेण्यासाठी आपला पारंपरिक वारसा आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे. समाजाचा मूळ व्यवसाय कापड उद्योगाशी संबंधित असल्याने, या क्षेत्रातील अनुभवाचा वापर करून नवीन संधी शोधता येतील. असे प्रतिपादन भावसार समाजाचे अध्यक्ष तथा बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर यांनी केले.



अंबाजोगाई येथील महेश दामोधर कलस्कर, संदेश महेश कलस्कर यांच्या न्यु सार्थक मेन्स वेअरचे अक्षय त्रतीयाच्या मुहूर्तावर उद्‌घटन संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून प्रकाशराव कानगावकर यांच्यासह लातूरचे युवा उद्योजक गोविंद सुत्रावे, गंगाखेडचे उद्योजक विनोद बारटक्के, लोह्याचे उद्योजक शुभम कलस्कर यांची उपस्थिती होती.

कलस्कर यांच्या दालनास शुभेच्छा देतांना प्रकाश कानगावकर म्हणाले की, भावसार समाजाच्या राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील संघटना तरुणांना मार्गदर्शन आणि व्यासपीठ उपलब्ध करून देत आहेत. यशस्वी उद्योजकांशी संवाद साधून त्यांच्या अनुभवातून शिकणे फायद्याचे ठरेल. स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी बँकांकडून कर्ज घेताना व्यवसायाचा ठोस आराखडा असणे गरजेचे आहे. कर्जाची वेळेवर परतफेड केल्यास पुढील वाढीसाठी अधिक भांडवल सहज उपलब्ध होऊ शकते. असेही ते म्हणाले. या उद्‌घाटन समारंभ अंबाजोगाई भावसार समाजाचे अध्यक्ष मणिष सुत्रावे, पवन धोत्रे, ॲड.रविंद्र धोत्रे, ऋषिकेश बर्डे, गणेश कळस्कर, वडवणी येथील मंगेश गार्डी, मनोज बारटक्के, भगवानराव पतंगे, डिगांबर पतंगे, लांडे, माजलगाव भावसार समाजाचे अध्यक्ष प्रदिप भावसार, श्रीराम कळस्कर, सुनील भावसार, सखाराम पतंगे, माणिकराव कुटे, तळणी येथील रविंद्र भावसार, माधव भावसार, जगन्नाथ भावसार, बाळासाहेब भावसार आदींची उपस्थिती होती.

न्यु सार्थक मेन्स वेअरचे संचालक महेश दामोधर कलस्कर, संदेश महेश कलस्कर, उद्योजक गोविंद सुत्रावे, विनोद बारटक्के, शुभम कळस्कर यांचा बीड जिल्हा भावसार समाजाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

## विशेष वृत्त

# बीड शहरात भगवान परशुराम जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक



**बीड (प्रतिनिधी):** भगवान परशुराम यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात रविवारी (दि.१९) सायंकाळी उत्साहपूर्ण वातावरणात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत रथामध्ये भगवान परशुरामांची आकर्षक मूर्ती सजवलेल्या वाहनरथात विराजमान करण्यात आली होती. रथाच्या पुढे बँड पथक, भजनी मंडळ तसेच मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते. मिरवणुकीस शहरातील धोंडीपुरा परिसरातून सायंकाळी ५ वाजता प्रारंभझाला. फटाक्यांच्या आतिषबाजीसह माळीवेस, सुभाष रोड मार्गे ही मिरवणूक मार्गक्रमण करत सहयोग नगर येथील सर्वेश्वर मंदिरात पोहोचली. येथे आरती व पूजन करून मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. परशुराम जयंतीनिमित्त शहरात दिवसभर विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कीर्तन, भजन, महाप्रसाद तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश होता. उत्सवामुळे संपूर्ण शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## लव्हरीत साडेतीन लाखांच्या वीज तारेची चोरी

**केज (प्रतिनिधी):** आवादा एनर्जी कंपनीच्या १९ विद्युत पोल वरील ३ लाख ५० हजार रुपये किंमतीची अॅल्युमिनियमची तार, हार्डवेअर व इन्शुलेटर चोरट्यांनी लंपास केल्याची घटना केज तालुक्यात घडली. केज तालुक्यात आवादा एनर्जी कंपनीच्या पवन ऊर्जा प्रकल्पाचे काम सुरू आहे. या कंपनीचे ३३ केव्ही लाईनचे फिडर नं ३ चे काम विडा व लव्हुरी या गावांमध्ये सुरू आहे. अज्ञात चोरट्यांनी ९ एप्रिल ते १० एप्रिल दरम्यान लव्हुरी या गावांतील सर्वे नं. २६९, २७०, २७१ मधील ११ लोखंडी पोलवरील एक ते दीड कि. मी. लांबीची अॅल्युमिनियम तार, हार्डवेअर व इन्सुलेटर असा ३ लाख ५० हजार रुपयांचे हे साहित्य चोरून नेल्याचे उघडकीस आले. १९ एप्रिल रोजी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी नितीन कांबळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

## असा यावा पाऊस देवा शेतकरी कवी संमेलनात दुष्काळ, आशा आणि संघर्षाचे जिवंत चित्रण

**माजलगाव (प्रतिनिधी):-** तालुक्यातील खेर्डा खुर्द येथे शेतकरी संघटनेच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात गुरुवारी (दि. १६) आयोजित करण्यात आलेले शेतकरी कवी संमेलन अत्यंत उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडले. ग्रामीण जीवन, दुष्काळ, शेतीची वेदना आणि शेतकऱ्यांचा संघर्ष या विषयांना स्पर्श करणाऱ्या कवितांनी उपस्थितांच्या मनाला भिडले. या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ग्रामीण कवी आत्माराम कुटे होते.

कार्यक्रमाची सुरुवात कवी सखाराम जोशी यांच्या पावसासाठी आसुसलेल्या भावनांनी ओथंबलेल्या असा बावा पाऊस देवा, रान ओल चिंब व्हावं, शेतकरी राजाला हिरवं सपान पडाचं या कवितेने झाली. यानंतर डॉ. अंगद गायकवाड यांनी शेतकऱ्यांच्या वास्तवातील हालअपेष्टा मांडताना वर तोंड करून सांगतो, घरी चहाला दूध नाही, शेतकऱ्याची औलाद तुझी, पाळ ना एक दोन गाई या ओळींमधून सामाजिक विसंगती अधोरेखित केली. बालाप्रसाद चव्हाण यांनी दुष्काळाचे भयावह चित्रण करत तहानल्या या वाड्यावस्त्या, तहानले हे गाव गाव रे, बरसायचे सोडून तुझी, कुणीकडे धाव रे अशी आर्त हाक दिली. बालासाहेब झोडगे यांनी जुन्या काळातील शेतीची समृद्धी आठवणीत आणत बांधामुळे गुराढोरांना हिरवा चारा मिळायचा, बांधावरील झाडांमुळे शिवार कसा फुलायचा असे म्हणत बदलत्या परिस्थितीवर भाष्य केले. विशाल वायाळ यांनी राजकीय वास्तवावर उपरोधिक टिप्पणी करत सरकार कुणाचेही असो, नेते, पुढारी, कार्यकर्त्यांचीच मजा, फक्त निवडणुका आल्या की देतात घोषणा, शेतकरी माझा बळीराजा या ओळींनी टाळ्यांचा कडकडाट मिळवला. कवयित्री लता जोशी यांनी कोरड्या जीवनाची वेदना व्यक्त करत सुकलेले रान, पान सुकलेल्या जीवनात क्षणभर विसाव्यास पाणी मिळावे आज कुठे? अशी हृदयस्पर्शी कविता सादर केली. खेलबा काळे यांनी शेतकरी आईच्या संघर्षाची कहाणी मांडताना जरी आला दुष्काळ अथवा सुकाळ आत्महत्या न केली तिने, कष्टत होती माझी माय या ओळींमधून जिद्दीचा संदेश दिला. कैलास साळुंके यांनी आशावाद व्यक्त करत बळीराजा येत आहे पाताळातून वर, त्याचं माप त्याच्यासाठी आता भरभरून भर असे म्हणत सकारात्मकतेची किनार दिली. मोहन राठोड यांनी हमीभावाच्या मुद्यावर ठाम भूमिका घेत राजा म्हणता बळीला तर, ठाव घ्या की रे, मालांना पुरेसा हमीभाव द्या की रे अशी मागणी मांडली. ना.मा. पडलवार यांनी निसर्गाच्या अनिश्चिततेवर भाष्य करत कधी गारपीट होई, कधी टिपूसही नाही कशा सोसाव्या दुःखाच्या झळा या ओळी सादर केल्या. उत्तम आवचार यांनी असहायतेची भावना व्यक्त करत अरे आभाळ फाटले, त्याला ठिगळ कसे जोडू गेली सावली जितन, तिला गोळा करू कसे अशी भावपूर्ण कविता सादर केली. अध्यक्षीय भाषणात कवी आत्माराम कुटे यांनी तुला नाही कळलं ते. मला नाही पटलं, शेतकरी दादा तुला दलालानं लुटलं या ओळींमधून शेतकऱ्यांच्या शोषणावर प्रकाश टाकला. या कवी संमेलनाचे प्रभावी सूत्रसंचालन ना.मा. पडलवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनंत शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास शेतकरी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष कालिदास आपेट, अच्युत गंगणे, शेख अजीमोद्दीन, शेख इस्माईल, अनंत शिंदे, महादेव गायकवाड, आण्णासाहेब मस्के, मुकुंद जोशी, प्रमोद सरवदे, सतीश रिंगणे, अच्युत मस्के, गणेश गायकवाड, कृष्णा होके, अंगद गायकवाड यांच्यासह गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शेतीमातीशी नाळ जुळलेल्या या सर्व कवितांना रसिकांनी भरभरून दाद देत संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेमुळेच भारताची अखंडता कायम : अंजली धानोरकर

### सिरसाळ्यात महामानवांचा जयंती सप्ताह उत्साहात

**परळी (प्रतिनिधी):** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेमुळेच भारताची अखंडता टिकून आहे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगरच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी केले. सिरसाळा येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मुख्य सोहळ्यात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

सिरसाळा येथे दरवर्षी ११ ते १७एप्रिल या कालावधीत 'महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सप्ताह' साजरा केला जातो. यावर्षीही विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर महामानवांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले. त्या पुढे म्हणाल्या की, १९४७साली इंग्रजांनी भारत सोडला तेव्हा देश भौगोलिक व सामाजिकदृष्ट्या विखुरलेला होता. विविध संस्थाने, जाती, धर्म



आणि भाषांच्या वैविध्यातून या देशाला एकसंघ राष्ट्र बनविण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून केले. त्यांनी महाडचा चवदार तळे सत्याग्रह, गोलमेज परिषद, पुणे करार आणि संविधान निर्मितीतील बाबासाहेबांच्या अभ्यासपूर्ण दृष्टिकोनाचा उल्लेख केला. तसेच समाज प्रगत करायचा असेल, तर वाचनाशिवाय पर्याय नाही, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. अध्यक्षस्थानी नवी मुंबईचे उपजिल्हाधिकारी महादेव किरवले होते. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे उद्धारकर्ते आहेत. त्यांच्या योगदानामुळेच समाजात समता आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार प्रत्येकाला प्राप्त झाला आहे. यावेळी माजलगावचे उपजिल्हाधिकान गौरव इंगोले म्हणाले, संघर्षांतूनच यत्र प्राप्त होते. शील आणि कर्तव्यनिष्ट जोपासणे, हेच महामानवांना ख अभिवादन आहे. या प्रसंगी संगी सहाय्यक आयुक समाधान किरवले, पोलीस अधिकान सुशांत सोनवणे, सचिन वंजारे, ने तानाजी व्हावळे, अभ्यासक भगवा साकसमुद्रे, मिलिंद चोपडे, बाब किरवले, माजी सरपंच मधुकर झिंजुड सचिन रणखांबे आदींसह नागरिक मोठ संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्य यशस्वीतेसाठी मधुकर किरवले, प्रमो किरवले, जयंती समितीचे अध्यक्ष अमोन किरवले, प्रकाश चोपडे, आबा कांबळ प्रकाश उजगरे, बापू किरवले यांनी विशे परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा. दयान झिंजुर्डे यांनी, सूत्रसंचालन प्रा. डॉ. विक्र धन्वे यांनी तर आभार रामदादा किरवल यांनी मानले.

## सावता परिषदेच्यावतीने द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त 'जागर विचारांचा' अभियान

**बीड (प्रतिनिधी):-** क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त सावता परिषदेच्या वतीने राज्यभर 'जागर विचारांचा' हे पंचा' हे व्यापक अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत राज्यातील दोनशे ठिकाणी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रधान महासचिव तथा प्रदेश प्रवक्ते डॉ. राजीव काळे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे दिली.

महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारपेरणीतून पुरोगामी समाजरचना उभी राहिली. समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जोपासना त्यांच्या साहित्य व कार्यातून घडली. वंचित व उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. आज

ग्रामीण वस्ती, तांडा यांसारख्या भागांतूनही प्रशासकीय अधिकारी घडत आहेत, हे फुले विचारांचेच यश असल्याचे अधोरेखित करण्यात आले. सामाजिक व शैक्षणिक जागृती अधिक बळकट करण्यासाठी साठी सावता परिषद कटिबद्ध असून, या द्विशताब्दी वर्षानिमित्त २०० व्याख्यानांच्या माध्यमातून 'विचारांचा जागर' घडविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. हे अभियान ११ एप्रिल २०२७ पर्यंत राज्यभर राबविण्यात येणार असून, ग्रामीण भागापर्यंत पोहोचण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. महात्मा जोतीराव फुले हे कृतीशील विचारांचे ऊजकेंद्र असून, त्यांच्या विचारांचा प्रसार हा समाजपरिवर्तनासाठी अत्यंत आवश्यक आहे. सावता परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने हे अभियान यशस्वी होईल, असा विश्वास डॉ. राजीव काळे यांनी व्यक्त केला.

# बोरदेवीतील शेतकऱ्यांना ७ तास लाईट तर सांडरवणच्या शेतकऱ्यांवर अन्याय का?

### सांडरवण येथील शेतकरी कमलाकर लांडे, उत्तरेश्वर दुबाले यांचा महावितरणच्या अभियंत्यांना सवाल

**बीड (प्रतिनिधी):** तालुक्यातील नाथापूर येथील ३३ के.व्ही.अंतर्गत येत असलेल्या बोरदेवीतील शेतकऱ्यांना सात तास लाईट दिली जात असून सांडरवण फिडर अंतर्गत येत असलेल्या गावांना सात तास लाईट दिली जात असून सांडरवण गावच्या शेतकऱ्यांना अवघी सहा तास लाईट देवून अन्याय का? असा सवाल महावितरणचे अभियंता यांना भ्रमणध्वनीवरुन शेतकरी कमलाकर लांडे व उत्तरेश्वर दुबाले यांनी विचारला आहे.

सांडरवण गावातील शेतकऱ्यांना गुंदा (वडगाव) फिडर अंतर्गत लाईट जोडण्यात आली असून जे की सांडरवण फिडर स्वतंत्र असतांना शेतकऱ्यांना मुद्दाहून गुंदा फिडरवर जोडण्यात आल्याने शेकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. सध्या कडक उन्हाळा सुरु असून मराठवाड्यात बीडच्या तापमानाची नोंद अधिकची होत आहे. त्यामुळे जनांवरांसह, गावातील नागरीकांना पिण्याचे पाणी तसेच पिकांना पाणी न मिळाल्याने नुकसान होऊ लागले आहे. लाईट संदर्भात शेतकरी कमलाकर लांडे व उत्तरेश्वर दुबाले यांनी अभियंता यांच्याशी चर्चा करुन सांडरवण गावातील शेतकऱ्यांना किमान आठवड्यातून ४ दिवस रात्रीची लाईट देण्यात यावी आणि उर्वरीत कालावधीत दिवसा लाईट द्यावी. तसेच एक दीड महिन्यावर पावसाळा सुरु होत असून शेतकऱ्यांना महावितरणने सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. यावर अभियंता यांनी आमच्या हातात काही नाही असे सांगून आम्हाला जो शेडूल येतो तो मुंबईवरुन येतो असे सांगून विषय बदलला असल्याने गावातील शेतकऱ्यांनी यावर नाराजी व्यक्त केली आहे. सांडरवण फिडरची लाईट किमान आठवड्यातून ४ दिवस रात्रीची नाही मिळाल्यास वरिष्ठांना निवेदन देणार आहोत. तसेच शेतकऱ्यांची मागणी मान्य न झाल्यास महावितरणच्या मुख्य कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशाराही प्रसिध्दी पत्रकाद्वारे कमलाकर लांडे व उत्तरेश्वर दुबाले, रामेश्वर लांडे, आप्पासाहेब दुबाले, भारत कांबळे, रविंद्र दुबाले, सिध्देश्वर दुबाले आदी शेतकऱ्यांसह ग्रामस्थांनी दिला आहे.

# महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा खरा स्वीकार करणे ही काळाची गरज-प्रकाशराव कानगावकर

### बारा बलुतेदार महासंघाच्यावतीने महात्मा बसवेश्वरांना जयंती दिनी अभिवादन

**बीड (प्रतिनिधी):-** भारतीय समाजजीवनात जयंती साजरी करणे ही केवळ परंपरा नसून ती आत्मपरीक्षणाची आणि प्रेरणा घेण्याची संधी असते. एक महान क्रांतिकारी समाजसुधारक म्हणजे महात्मा बसवेश्वर त्यांची आज जयंती. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा खरा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन बारा बलुतेदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी बारा बलुतेदार महासंघाच्यावतीने आयोजित अभिवादना प्रसंगी केले.

लिंगायत समाजाचे निर्माते महान क्रांतिकारी समाजसुधारक महात्मा बसवेश्वर यांच्या रविवार, १९ एप्रिल रोजी जयंती निमित्त अभिवादन सभेत बोलतांना प्रकाशराव कानगांवकर म्हणाले की, ही केवळ एका



संताची आठवण नसून, ती समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना पुनश्चः जागवण्याची वेळ आहे. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा खरा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. जातिभेद, अंधश्रद्धा आणि अन्याय याविरुद्ध उभे राहणे हीच बसवेश्वरांना खरी आदरांजली ठरेल असेही ते म्हणाले.

या अभिवादन सभेस धनगर समाजाचे नेते अंकुश निर्मळ, सोनार समाजाचे अॅड.संदीप बेद्रे, कोष्टी समाजाचे सुरेश असलेकर, मुस्लिम ओबीसी संघटनेचे रफिक बागवान, परीट धोबी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष अॅड.सुधीर जाधव, राजपूत संघटनेचे राणा चव्हाण, शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन शहागडकर, कैकाडी समाजाचे जिल्हाध्यक्ष रमेश कैवाडे, परीट समाजाचे शहराध्यक्ष रमेश घोडके, एसबीसी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दगडू म्हेत्रे, साळी समाजाचे जिल्हाध्यक्ष राजू ताठे, गोसावी परिषदेचे अॅड. राजेंद्र बन, नाभिक समाजाचे गुलाब चव्हाण, मोरे, सुतार समाजाचे बापूराव भालेकर, लोहार संघटनेचे आशोक आनेराव, जंगम समाजाचे उमेश स्वामी, विजय मानकुस आदींसह बारा बलुतेदार महासंघाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अबॅकस मधील सर्वोत्कृष्ट यशस्वी विद्यार्थी अर्णवकुमार कांबळेची पुणे येथील अबॅकस ऑलिम्पियाडसाठी निवड

### अर्णवकुमार राहुल कांबळेला सर्वोत्कृष्ट जागतिक अबॅकस स्पर्धक मानद साईटेशन

**बीड (प्रतिनिधी):** यशस्वी अबॅकस विद्यार्थ्यांची तयारी करण्यासाठी अबॅकसला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. २७ मार्च २०२६ मध्ये झालेल्या अबॅकस दुसऱ्या लेवल स्तरावरील अबॅकस परीक्षामध्ये अर्णवकुमार राहुल कांबळे विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक यश संपादन केले आहे. अरुणकुमार राहुल कांबळेने ५ मिनिटांमध्ये ६० प्रश्न सोडवल्यामुळे समाजातील सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन होत असून फर्स्ट रनरअप म्हणून विद्यार्थ्यांचा शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे सत्कार करण्यात आलेला असून १ मे २०२६ महिन्यामध्ये होणाऱ्या पुणे अबॅकस चॅम्पियनशिपसाठी अरुणकुमार राहुल कांबळेची निवड करण्यात आलेली आहे.

वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, अशा जगातील तीन ते चार देशातील विद्यार्थ्यांपैकी अर्णवकुमार राहुल कांबळेची यश मिळवून जागतिक स्तरावर निवड झालेली आहे. इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ घोडके सरांनी मास्टर. अरुणकुमार राहुल कांबळेचा सत्कार केला असून त्याने गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न केल्यामुळे यश मिळालेले आहे असे सांगितले तसेच अबॅकस तंत्रामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो आणि बुद्धिमत्तेचा सर्वोत्कृष्ट विकास होतो असे विशेष मार्गदर्शन डॉ. घोडके एस ए. यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील अडचणींना सामोरे जाण्यासाठी अबॅकसचा उपयोग होऊन अबॅकस स्मार्ट वर्क प्रयत्नांची स्तुती केली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनी आणि शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून त्यांनाही यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. अर्णवकुमार राहुल कांबळेची ऑनलाइन पुणे अबॅकस १ मे २०२६ महिन्यामध्ये होणाऱ्या जागतिक अबॅकस चॅम्पियनशिप करीता निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

**शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस.ए.यांनी सांगितले आहे.**



# महात्मा बसवेश्वर महाराजांच्या विचारांची आज समाजाला मोठी गरज: माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड (सरकार): महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात जातीभेद मोडून स्त्री-पुरुष समानतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्याची दखल आजही जग घेत आहे. अशा महापुरुषांचे विचार समाजाला दिशा देणारे असून, आजच्या काळात त्यांच्या विचारांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

वीरशैव समाजाच्या वतीने आयोजित महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्सवानिमित्त ते बोलत होते. यावेळी समाजातील विविध मान्यवर आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याला डॉ.योगेश क्षीरसागर, हर्षद क्षीरसागर, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा, नगरसेवक शुभम धूत, बबनराव गोरे, राजेंद्र बनसोडे, निवासी जिल्हाधिकारी (विभागीय) शिवकुमार स्वामी, नगरसेवक राकेश जाधव, राणा चव्हाण यांच्यासह वीरशैव समाजातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या.

यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, बसवेश्वरांनी १२ व्या शतकात अनुभव मंडपाच्या माध्यमातून लोकशाही आणि समतेची पायाभरणी केली. सामाजिक एकता निर्माण करून समाजात



पसरलेली अंधश्रद्धा, विषमता आणि जातीच्या भिंती तोडून सर्वांनी एक समाज म्हणून एकत्र येणे आणि विकास साधणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. स्त्रियांना मानाचे स्थान मिळावे, हे बसवेश्वरांच्या कार्याचे प्रमुख सूत्र होते. आजही महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या विचारांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. या जयंती निमित्त आयोजित या सोहळ्यात वीरशैव लिंगायत समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय उत्साही आणि भक्तिमय वातावरणात हा जयंती उत्सव संपन्न झाला. या कार्यक्रमास शिवाप्पा भुरे, अशोक शहागडकर, अशोक आप्पा पाटील, अनिल मिटकरी, बाळू मिटकरी, उत्तरेश्वर आप्पा कानडे, कुंभेश्वर विभुते, संदीप शेटे, राजेंद्र राजमाने, बंडू शेटे, पंकज पायगुडे, अनंत शहागडकर, दिलीप ढेपे, सचिन परंडकर, चंद्रकांत कानडे, अमर ढेपे, अमोल होनराव, गणेश स्वामी, अमर शेटे, सतीश आप्पा नगरे, सचिन आप्पा शहागडकर, उत्तरेश्वर स्वामी काळेगावकर, गुरुलिंग आप्पा बेदरकर, आंधळकर आप्पा, महेश शेटे, सिद्धेश्वर शहागडकर, संजय घाळे, विलास आप्पा, रवींद्र स्वामी बेदरकर, सचिन रेगुडे, पशुपती मिटकरी यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

## भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या किशोरी साठेचे कराटे चॅम्पियन स्पर्धेत यश

गेवराई (सरकार): तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या किशोरी साठे या विद्यार्थीनीने राज्यस्तरीय ओपन कराटे चॅम्पियन स्पर्धेत कास्यपदक संपादन केले आहे.

धाराशिव येथे झालेल्या राज्यस्तरीय ओपन कराटे चॅम्पियन स्पर्धेमध्ये कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी, ता. गेवराई जिल्हा बीड ची इ.११ वी ची विद्यार्थिनी कु. साठे किशोरी लक्ष्मण हिने कास्यपदक संपादन केले.



तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ. राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए. एस., पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, सोनवणे आर. आर., क्रीडा विभाग प्रमुख कळासे ए. आर., घोरड आर. डी., सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थांनी तिचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी खूप-खूप शुभेच्छा दिल्या.

## बीडमध्ये उसळला भीमसागर!

### आनंद शिंदेंच्या भीम गीतांत न्हाऊन निघाले बीडकर

बीड (सरकार): महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त रविवारी झालेल्या आनंद शिंदे यांच्या भीम गीतांच्या कार्यक्रमास भीमसागर उसळला. यावेळी आनंद शिंदेंनी सादर केलेल्या भीम गीतांत बीडकर न्हाऊन निघाले.



बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली रविवारी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. दरम्यान सायंकाळी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे ख्यातनाम लोकगायक आनंद शिंदे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास बीड शहर व परिसरातील भीम सैनिकांनी अलोट गर्दी केली. यावेळी भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला अभिवादन करून भीम गीतांच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. गायक आनंद शिंदे यांनी एकाहून एक भीम गीतं सादर करत उपस्थित भीमसैनिकांच्या भावनांना हात घातला. महापुरुषांच्या जयंतीत जीव ओतून काम करण्यासाठी सर्वदूर परिचित असलेले आ. संदीप क्षीरसागर यांनी भीम गीतांच्या कार्यक्रमाचे चोख नियोजन केले होते. विशेष म्हणजे आ. क्षीरसागर यांच्या नियोजनातून या कार्यक्रमास उपस्थित सर्व भीम कन्यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला.

## पोखरी (घाट) गावातील रस्त्यालगत धोकादायक विहिरींना संरक्षक कठडे बसविण्याची ग्रामस्थांची मागणी

बीड (सरकार)नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे रस्त्यालगतच्या विहिरीत कार कोसळून ९ जणांचा मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेनंतर राज्यभरात अशा धोकादायक विहिरींचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील विविध गावांमध्येही रस्त्यालगत असलेल्या विहिरींबाबत ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार बीड यांना निवेदन देऊन रस्त्यालगत धोकादायक स्थितीत असलेल्या विहिरींची तातडीने पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. संबंधित विहिरींच्या मालकांना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संरक्षक भिंत किंवा कठडा उभारण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशीही त्यांनी मागणी केली. दरम्यान, बीड तालुक्यातील पोखरी (घाट) येथील खिल्लारे वस्ती परिसरात रस्त्याच्या कडेला असलेली विहीर अत्यंत धोकादायक अवस्थेत असून तिच्याभोवती कोणतीही संरक्षण व्यवस्था नसल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या विहिरीमुळे लहान मुले, दुचाकीस्वार, बैलगाड्या तसेच जनावरांच्या जीविताला धोका असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर ध्रुपदी खिल्लारे, गोरख खिल्लारे, मधुकर खिल्लारे, मच्छिंद्र खिल्लारे, बबन खिल्लारे, जालिंदर खिल्लारे, हौसराव खिल्लारे, साहेबराव धुमाळ, दत्तु खिल्लारे यांसह खिल्लारे, मुळीक व झांजुर्णे वस्तीवरील ग्रामस्थांनी संबंधित विहिरीला तातडीने संरक्षक कठडा किंवा भिंत उभारण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांनी दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, अशी ठाम भूमिका घेतली असून, याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## बीड पोलीसांकडून धडधडणाऱ्या सायलेन्सरचा खेळ खल्लास

बीड (सरकार) बीड शहरात बुलेट मोटारसायकलच्या सायलेन्सरमधून होणार्या कर्णकर्कश आवाजाविरोधात पोलिसांनी आता जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आक्रमक पवित्रा घेतला आहे. रस्त्यावर धुमाकूळ घालत नागरिकांची झोप उडवणार्या आणि कायद्याची पायमल्ली करणार्या वाहनधारकांवर विशेष दंडात्मक मोहीम राबवत पोलिसांनी नियम मोडणार्यांचे सायलेन्सर जप्त करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे यावेळी नव्याने रुजु झालेले वाहतुक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीपकुमार खेडकर यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार अजिनाथ मुंडे, पोलीस चालक संतोष हारके, पोलीस हवालदार राहुल गायकवाड, पोलीस अंमलदार मोहन बनसोडे, संतोष मोरे, शेषनारायण गाडे, पोलीस चालक अंमलदार नारायण वाघमारे उपस्थित होते.

सदरील कारवाई ही दि.१८ एप्रिल



२०२५ शनिवार रोजी सायंकाळी ५ ते ७ च्या दरम्यान अंबिका चौक व माने कॉम्प्लेक्स या ठिकाणी करण्यात आली. ज्यामध्ये एकुण १५ बुलेटचे सायलेन्सर जप्त करण्यात आले. तसेच फॅन्सी नंबरप्लेटवर देखील कारवाई करण्यात आली. पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढे ही मोहीम सातत्याने चालू राहील जे सायलेन्सर मोडीफाय करुन लावले असतील ते तात्काळ बदलून मुळ कंपनीचे सायलेन्सर लावण्यात यावे. रस्त्यावर स्टंटबाजी करणार्या तसेच विशेषतः कॉलेज, क्लासेस, रहदारीच्या ठिकाणी मुद्दामहून होणार्या वाहनांच्या आवाजाचा त्रास आणि कायद्याचे उल्लंघन खपवून घेतले जाणार नाही. नियम मोडाल, तर थेट मोठी कारवाई होईल असा इशारा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाकडून होणार्या या कारवाईमुळे शहरात शिस्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न असून, नागरिकांनीही या मोहिमेचे स्वागत केले आहे तसेच समाधान व्यक्त होत आहे.

## कल्याण आखाडे यांना विधानपरिषदेत संधी द्यावी-राऊत

बीड (सरकार): सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष मा. कल्याणजी आखाडे यांना विधानपरिषदेत संधी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी सावता परिषदेचे बीड जिल्हा अध्यक्ष किशोर राऊत यांच्यासह सर्व धर्मातील त्यांच्या समर्थकांकडून होऊ लागली आहे. महाराष्ट्रमध्ये माळी समाजाचे सामाजिक तथा राजकीय उत्थान व्हावे यासाठी अहोरात्र मेहनत घेत कल्याणजी आखाडे यांनी महाराष्ट्र राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये सावता परिषदेच्या माध्यमातून कार्य संघटनेचे जाळे तयार केलेले आहे.



माळी समाजातील वंचित, पिढीत, शोषित, उपेक्षित आदी घटकांचा आवाज म्हणून आज कल्याणजी आखाडे यांची पूर्ण महाराष्ट्रभर ओळख निर्माण झालेली असून या प्रकारच्या धडाडीच्या व सर्वसामावेशक, दूरदृष्टी चेहऱ्याला पक्षाने एकदा जनसेवेची संधी द्यावी अशी भावना किशोर राऊत यांच्यासह बीड जिल्ह्यातील सर्व धर्मीयातील सर्वसामान्य जनता व्यक्त करू लागली आहे.अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेसोबत खांद्याला खांदा लावून कार्य करताना मा. कल्याणराव आखाडे यांनी आपली निष्ठा आणि प्रामाणिकता सिद्ध केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मजबूत संघटन उभे राहिले आहे. विधानसभा, लोकसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सावता परिषदेची भूमिका निर्णायक ठरलेली आहे.पक्षाच्या वाढीसाठी घेण्यात आलेले मोर्चे,मेळावे, शिबिरे आणि संघटन बळकटीसाठी सावता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यामुळे मा. कल्याणराव आखाडे यांच्या कार्याचा, निष्ठेचा व संघटन कौशल्याचा योग्य सन्मान म्हणून त्यांना विधानपरिषदेत संधी देणे आवश्यक असल्याची भावना राज्यभरातील सावता परिषद पदाधिकारी, सावता सैनिक, समाजबांधव आणि हितचिंतकांनी व्यक्त केलेली असून राष्ट्रवादी पक्षाच्या सर्वेसर्वा उपमुख्यमंत्री सुनिता पवार यांनी कल्याण काका आखाडे यांना जबाबदारी देत पालकत्वाची भूमिका बजवावी अशी देखील भावना किशोर राऊत यांनी व्यक्त केलेली आहे.

## १६ मे पासून ४५५३ प्रगणक करणार जनगणना

बीड (सरकार) भारताच्या विकासाची नवी दिशा ठरवणारी 'जनगणना २०२७' यंदा ऐतिहासिक ठरणार आहे. ही जनगणना पूर्णपणे डिजिटल स्वरूपात पार पडणार असून महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यात या प्रक्रियेचा पहिला टप्पा १६ मे २०२६ पासून सुरू होणार आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, नागरिक आता घरबसल्या आपली माहिती 'सेल्फ-इन्युमरेशन'द् वारे नोंदवू शकणार आहेत. नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात सहभाग घेऊन १ मे पासून उपलब्ध होणाऱ्या पोर्टलवर आपली अचूक नोंदणी करणे आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यातील सरकारी योजनांचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येईल. यंदा जिओ मॅपींग तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे एकही घर किंवा वाडी-वस्ती गणनेतून सुटणार नाही. विशेषत: शिक्षकांसाठी ही डिजिटल प्रणाली सोयीची ठरणार आहे.

जनगणनेच्या वेळा व टप्पे

जनगणनेची प्रक्रिया दोन मुख्य टप्प्यांत राबवली जाणार आहे. स्व-नोंदणी-१ मे २०२६ पासून नागरिक वेबसाइटवर स्वत:ची मासहिती भरू शकतात.

पहिला टप्पा:१६ मे ते १४ जून २०२६ या काळात प्रगणक घरोघरी जाऊन घरांची यादी तयार करतील.

दुसरा टप्पा:लोकसंख्या मोजणी फेब्रुवारी २०२७ मध्ये केली जाईल.

### मुस्लिम समाजाच्या आरक्षण संरक्षणासाठी एक मे ला आंदोलन

बीड (सरकार):मुस्लिम आरक्षणाचे आंदोलन न थांबता त्याला गती व बळकटी मिळण्यासाठी मुस्लिम समाजाच्या आरक्षण संरक्षणासाठी महाराष्ट्र दिनी एक मे ला आंदोलन करणार या आंदोलनाने बीड मुंबई दिल्लीचे लक्ष केंद्रीत करणार आंदोलनापुर्वी मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेणार अशी माहीती आंदोलनकर्ते ॲड. प्रा. इलियास इनामदार यांनी दिली आहे.

## चारधाम यात्रापूर्ती निमित्त दैठण्यात तीन दिवसीय भव्य कीर्तनमहोत्सव

### मंत्री पंकजा मुंडे, आ. धनंजय मुंडेंसह दिग्गजांची राहणार उपस्थिती

परळी (सरकार): तालुक्यातील दैठणा घाट येथे चारधाम यात्रेनिमित्त भव्य असा मावंद्याचा कार्यक्रम आयोजित केला असून दिनांक २२ एप्रिल ते २४ एप्रिल तीन दिवस भव्य श्री ज्ञानोबाराय चरित्र कथा व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार रत्नाकर गुट्टे यांच्यासह इतर दिग्गज मंडळींची उपस्थिती लाभणार आहे.

परळी तालुक्यातील डोंगराच्या कुशीत वसलेल्या दैठणा घाट या गावातील बालाजी वैजनाथ गुट्टे आणि मंदोदरी बालाजी गुट्टे यांनी चार धाम यात्रा पूर्ण करून आल्याबद्दल भव्य मावंद्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २२ एप्रिल ते २४ एप्रिल दरम्यान होणाऱ्या कार्यक्रमामध्ये सकाळी ८ ते १० ह.भ.प. कृष्णा महाराज गुट्टे यांची ज्ञानोबाराय चरित्र कथा, ११ ते १ राम कृष्णहरी जप, २ ते ४ दुपारचे कीर्तन, ८ ते १० रात्रीचे किर्तन, रात्री जागर आणि पहाटे काकडा भजनाचा समावेश असून तिन्ही दिवशी अल्पोपहार तसेच भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. पहिल्या दिवशी म्हणजे २२ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता सौ. सुदामती गुट्टे यांच्या हस्ते कलशपुजन सोहळा होऊन कथेला सुरुवात होईल. त्यानंतर आई-वडील वैजनाथराव गुट्टे आणि अनुसया गुट्टे यांचं मातृपितृ पूजन सोहळा पार पडेल. दुपारी २ ते ४ ह.भ.प. आचार्य अर्जुन महाराज लाड यांचं तर रात्री ८ ते १० ह.भ.प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांचे कीर्तन होईल. दुसऱ्या दिवशी २३ एप्रिल रोजी सकाळी कथा, दुपारी २ ते ४ ह.भ.प. जयवंत महाराज बोधले तर रात्री ८ ते १० ह.भ.प. ज्ञानेश्वर (मोठे कदम) माऊली यांचं कीर्तन होईल. तर तिसऱ्या दिवशी २४ एप्रिल रोजी सकाळी कथा झाल्यानंतर मिरवणूक आणि २ ते ४ ह.भ.प. डॉ. नारायण महाराज जाधव यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता व त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.

या तीन दिवसीय मावंद्याच्या कार्यक्रमाला पहिल्या दिवशी आमदार रत्नाकर गुट्टे, दुसऱ्या दिवशी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, तुकाराम महाराज शास्त्री, प्रभाकर महाराज झोलकर आणि तिसऱ्या दिवशी माजी कृषिमंत्री आमदार धनंजय मुंडे, शिवसेना नेते टी. पी. मुंडे, माजी आमदार संजय दौंड यांच्यासह इतर सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील दिग्गज मंडळी भेट देणार आहेत. या भव्यदिव्य किर्तन महोत्सवाला पंचक्रोशीतील मंडळींनी उपस्थित राहून शोभा वाढविण्याची विनंती दैठणा घाट येथील गावकरी मंडळी आणि आयोजक बालाजी गुट्टे, मंदोदरी गुट्टे, नितीन गुट्टे, शुभांगी गुट्टे, कृष्णा महाराज गुट्टे, ज्ञानेश्वरी गुट्टे, कु. भक्ती, रेवा, गार्गी आणि समस्त गुट्टे कुटुंबाने केली आहे.

## महिला आरक्षण विधेयकाला विरोध

### केजमध्ये शिवसेनेच्या वतीने काँग्रेसचा जाहिर निषेध

केज (सरकार): महिलांना राजकारणात समान संधी मिळावी, त्यांचे प्रतिनिधित्व वाढावे आणि त्यांचा आवाज सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहोचावा यासाठी केंद्र सरकारने महिला आरक्षण विधेयक लोकसभेत सादर केले. मात्र काँग्रेसने




विधेयकाला विरोध करुन महिलांच्या हक्कांवर आघात केला तर महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिवसेना सदैव कटिबद्ध असल्याचे माजी आमदार संगीताताई ठोंबरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.

महिला आरक्षण विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेसचा निषेध करण्यासाठी केज येथे भवानी चौकात शनिवारी (दि.१८)शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या आंदोलनात शिवसैनिकांनी काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपला संताप व्यक्त केला. यावेळी सचिन मुळूक यांनी आपल्या भाषणात काँग्रेसवर टीका केली. ते म्हणाले की, केंद्राच्या महिला आरक्षण विधेयकाला काँग्रेसने याला विरोध करून महिलांच्या प्रगतीत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला आहे. अशा भूमिकेला जनता कधीही स्वीकारणार नाही आणि योग्य वेळी त्यांना याचे उत्तर दिले जाईल असा इशारा मुळूक यांनी दिला.

या वेळी माजी आमदार संगीता ठोंबरे यांनीही काँग्रेसच्या भूमिकेवर सडकून टीका केली. महिला आरक्षण विधेयक हे महिलांच्या भविष्यासाठी अत्यंत आवश्यक असून, त्याला विरोध करणाऱ्यांविरोधात शिवसेना रस्त्यावर उतरून लढा देत राहील, असा इशाराही त्यांनी दिला. या आंदोलनात महिला आघाडी शहर प्रमुख वैशालीताई सांगळे, शितलताई सोनवणे, मुक्ताताई गडमवार, ज्ञानेश्वरी ताई सांगळे, ज्येष्ठ शिवसैनिक अशोक जोगदंड, डॉक्टर संतोष बुडुक, तालुका सचिव विकास काशीद, उपतालुकाप्रमुख महिंद्र चाटे, उपतालुकाप्रमुख सुग्रीव बसवर, शेतकरी सेना तालुकाप्रमुख आदित्य रांजणकर, विभाग प्रमुख बाबासाहेब डोईफोडे, उपतालुकाप्रमुख योगेश देशमुख, युवा सेना उपतालुकाप्रमुख ज्ञानेश्वर भांगे, संजय गायके, शिवाजी मोहिते, मोहन ढाणे, पोपट लोंढे, संदीप नाईकवाडे, महेश कदम यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी काँग्रेसविरोधात तीव्र घोषणाबाजी करत निषेध नोंदवला.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)